कि.फौ.अर्ज. क्र.०५/२०२४
किरण वि. अमोल
**नि.क्र. ४०**

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.१ चा अधीकचा सरतपास श्री. एम. डी. पालीवाल यांच्यातर्फे शपथेवर सुरुः–**

१. मी माझा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.४०** वर दाखल केले आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला मराठीत समजवून सांगितला आहे तो बरोबर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**गैरअर्जदार तर्फे उलटतपास श्री. ए. आर. ईटनकर वकील साहेब यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

२. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. १९ खोटी भेटवस्तूची यादी आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. १९ प्रमाणे कोणतेही सामान लग्नात भेट म्हणून मिळाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, लग्नात गैरअर्जदारास गाय भेट दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनमध्ये गैरअर्जदारास गाय परत मागितली होती याबाबतचा दस्त अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार पोलीस स्टेशनला आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हा पोलीस स्टेशनला आला व गाय परत देत नाही असे म्हणला हा माझ्या पुराव्यातील शपथपत्रातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. २४/०५/२०२३ पासून ते आजपर्यंत अर्जदार सासरी गेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजपासून मागील सहा महिन्याच्या कालावधीत अर्जदार गैरअर्जदाराकडे गेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्यातील शपथपत्रातील परिच्छेद क्र. ५ मधील संपूर्ण मजकूर खोटा आहे. पुराव्यातील शपथपत्रातील मजकूर मी वकील साहेबांना सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील मजकूर इंग्रजीमध्ये असल्याने काय आहे तो माहीत नाही, साक्षीदार

स्वतःहून सांगतो की तो मला मराठीत वाचून दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्यातील शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खोटी तक्रार दिल्याने पोलीसांनी त्यावर काही कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदारास मदत व्हावी या करिता अर्जदाराच्या सांगण्यावरुन खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.01.29 16:20:41 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.01.29 16:20:48 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः २९/०१/२०२६